**किरकोळ फौ.क्रं. २०९/२०१९**
**तसिना—वि—अंशल**
**नि.क्र. ५७ व ८६ पुढे**

**<u>अर्जदार साक्षीदार क्रं.१ यांचा उर्वरित उलटतपास गैरअर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस. आर थोरात यांचेमार्फत शपथेवर सुरू...</u>**

२८. हे म्हणणे खरे आहे की मला बाळ हा जन्मापासुन अस्वस्थ होता हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी प्रसुतीच्या तीन महिन्यानंतर माझे बाळाला आईचे दुध देणे डॉक्टरांना न विचारता बंद केले होते. हे म्हणणे खरे आहे की बाळ जन्माला आल्यानंतर सुध्दा मी रात्रीचे पाळीवर कामावर जात होते. हे म्हणणे खरे नाही की मी कामावर रात्रीचे पाळीवर जेव्हा जात होती तेव्हा गैरअर्जदार क्रं. १ व माझी आई बाळाची काळजी घ ेत होती. हे म्हणणे खरे नाही की बाळाची काळजी घेण्याकरिता गैरअर्जदार क्रं. १ ने काम सोडण्याकरिता आग्रह केला होता. हे म्हणणे खरे आहे की मी माझे आईवडिलांना एकुतली एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की मी एकुतली मुलगी असल्यामुळे माझे आई वडिली मला खुप प्रेम करित होते व माझे व्यावहारिक संसारात दखल घेत होते. हे म्हणणे खरे नाही की माझे आईवडिलांनी आमचे व्यावहारिक संसारात दखल घेतल्यामुळे गैरअर्जदार क्रं. १ ला मानिसक त्रास सुरु झाला. हे म्हणणे खरे नाही की माझे त्रासामुळे सन २०१५ मध्ये गैरअर्जदार क्रं. १ ला लोकमान्य हॉस्पीटल येथे भरती केले होते. गैरअर्जदार क्रं. १ हा उस्मागिरी हॉस्पीटल येथे भरती होता याबद्दल मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे आई वडिलांचे दबावामुळे मी गैरअर्जदार क्रं. १ चे उपचाराकरिता त्याचंसोबत केरळ येथे गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ची तब्येत बरी राहत नव्हती म्हणुन मी त्याचेसोबत राहण्यास नकार दिला होता.

२९. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हा मला मानसिक व शारिरीक त्रास देत होता हे दर्शविण्यासाठी मी कोणतेही दस्त प्रकरणात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. २ व ३ यांनी मला कधीच माझे पगाराबद्दल विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. ३ जेव्हा पुणे येथे दवाखान्यात भरती होते तेव्हा मी त्यांना भेटण्याकरिता दवाखान्यात

गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. ३ आमचेसोबत राहु नये म्हणुन त्याचे ऑपरेशन झाल्यानंतर चांगले जीवन जगु शकतात असे मी माझे अर्जात नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ने मला त्यांचे आईवडिलांची काळजी घेण्याकरिता केरळा येथे जाण्यासाठी आग्रह केला होता. हे म्हणणे खरे आहे की माझे आईवडिलांचे दवाबामुळे मी केरळा जाण्याकरिता नकार दिला होता. हे म्हणणे खरे नाही की जेव्हापण गैरअर्जदार माझे सांगणेप्रमाणे वागत नव्हता तेव्हा मला राग यायचा. हे म्हणणे खरे आहे की माझे भाडयाचे घर माझे आई वडिलांचे घरापासुन पायी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की जेव्हा मी रात्री पाळीवर कामाला जात होते तेव्हा घरातील सर्व काम गैरअर्जदार क्रं. १ पाहत होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ने बनविलेले जेवण मी जेवत नव्हते.

**३०.** हे म्हणणे खरे नाही की माझे व गैरअर्जदार क्रं. १ कडे आरोग्यविमा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी गर्भवती असतांना गैरअर्जदार क्रं. १ माझेसोबत सोनाग्राफी व इतर कामासाठी येत होता व त्याचा संपुर्ण खर्च गैरअर्जदार क्रं. १ करित होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. ३ ही ६३ वयाची महिला असल्यामुळे तिला दुस—याचे सहाय्य व्यतिरीक्त चालता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. ३ यांनी बाथरुमचा दरवाजा तोडला होता त्याबद्दल मी माझ्र प्रतिज्ञालेखात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की कार खरेदी करण्याचा माझा वैयक्तिक निर्णय होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ला कार खरेदी करण्याची ईच्छा नव्हती कारण त्याचेवर त्याचे आजारी आईवडिल व माझी जवाबदारी होती. हे म्हणणे खरे नाही की मी माझे पगारातुन माझे परिवारावर खर्च करित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ ने मला कार लोन करिता कधीच त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार हा कधीच सिगरेट पीत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. २ व ३ माझे माहेरी मी सहा महिन्याची गर्भवती असतांना आले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे हट्टी वागणुकीमुळे मी गैरअर्जदाराला मानसिक त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की माझे प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्रं. ५१ मधील मजकुर खोटे व बनावटी आहे.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की प्लॅट खरेदी करण्याचा माझा एकटीचा निर्णय होता. हे म्हणणे खरे नाही की माझे वडिल गैरअर्जदार क्रं. १ ला प्लॅट घेण्याकरिता दवाब टाकत होते. रिव्हर रेसीडन्सी मधील प्लॅट घेण्याकरिता गैरअर्जदार क्रं. १ त्याची पसंत दाखविली नव्हती व सदरचा प्लॅट माझे वडिलांनी पसंत केला होता. हे म्हणणे खरे नाही की गैरअर्जदार क्रं. १ वर इतर जबाबदारी असल्यामुळे ते प्लॅट खरेदी करण्याकरिता नकार देत होते. हे म्हणणे खरे नाही की विकत घेतलेला प्लॅट हा फक्त माझे ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरचा प्लॅट हा मी भाडयाने दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ४३ वरील प्रतिज्ञालेखातील मागील दोन महिन्यापासुन रुपये ११,५००/— प्रतिमहा भाडे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजसुध्दा सदरचे भाडे मी घेत आहे.

**प्रश्न :—** तुम्ही तुमचे प्लॅटचे लिव्ह ॲण्ड लायन्संस ॲग्रीमेंट दाखल करु शकता का?

**उत्तर :—** प्लॅट हा गैरअर्जदार क्रं. १ ने भाडयाने दिला होता म्हणुन मी दाखल करु शकत नाही.

**३२.** हे म्हणणे खरे नाही की मी गैरअर्जदार क्रं. १ ला आमचे प्लॅटवर येउ देत नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे मुलाचे पहिले वाढदिवस केरळा येथे साजरा करण्यात आले होते.

**अर्जदार साक्षीदार क्रं. १ यांचा गैरअर्जदारातर्फे उलटतपास गैरअर्जदार यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकुब.**

**उलटतपास तहकुब.**

—समक्ष—

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.09.25 17:57:11 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**
**दि.२५.०९.२०२५**

AL AMOODI ABDUL KHAYYUM Digitally signed by AL AMOODI ABDUL KHAYYUM Date: 2025.09.25 17:57:15 +0530

**( अल अमुदी ए.के. )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**पिंपरी, पुणे.**

**– प्रमाणपत्र –**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : श्रीमती किर्ती उदय पवार

न्यायालयाचे नांव : अल अमुदी ए . के., न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे.

न्यायनिर्णयाचे /ओदशाचे दिनांक :२५/०९/२०२५

न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक :२५/०९/२०२५

पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक :२५/०९/२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखक(श्रेणी–iii)